| MHNS230013332024 | कौ.हिं.म.सं.अर्ज क्र. २४/२०२४<br>अंजना व इतर वि. संजय व इतर |
|---|---|

## निशाणी क्र.१७ वरील आदेश

(पारीत दिनांक २७ जानेवारी २०२६)

सदरचा अर्ज हा अंतरिम अंतरिम दिलासे मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

१. प्रस्तूत अर्जाद्वारे अर्जदार असे कथन करते की, तिचा विवाह गैरअर्जदार क्र. १ याच्यासोबत आदीवासी समाजाच्या चालीरितीरिवाजानुसार दिनांक ०५.०६.२००६ रोजी संपन्न झाला. अर्जदार क्र.१ हिस गैरअर्जदार क्र.१ पासून दोन मुली व एक मुलगा झालेले असून उभयतांमधील लग्नसंबंध अद्यापपावेतो कायम आहेत. विवाहानंतर अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदारांच्या मौजे वारूंघुशी, ता.अकोले, जि.अहमदनगर येथे एकत्र कुटुंबात नांदायला गेली होती. सुरूवातीचे काही दिवस गैरअर्जदारांनी अर्जदाराला व्यवस्थित वागणूक दिली परंतू त्यानंतर गैरअर्जदारांनी अर्जदारास त्रास देण्यास सुरूवात केली. त्यानंतर गैरअर्जदार हा मुंबई येथे बीएसटी मध्ये वाहनचालक या पदावर नोकरीला असल्याने गैरअर्जदाराने २००९ मध्ये अर्जदारास म्हणाले की, आपण मुंबई येथे राहायला जायचे आहे तर तु माझ्या माहेरून घर भाडे व डिपॉसिटसाठी रक्कम रू.२,३५,०००/– घेवून ये तेव्हा अर्जदाराचे आई वडिलांनी शेती गहाण ठेवून सदरची रक्कम दिली व त्यानंतर गैरअर्जदार यांनी अर्जदारास नवनाथ कॉलनी ओमकारनगर आंबीवली वेस्ट, ता.कल्याण, जि.ठाणे येथे राहायला नेले. त्यानंतर काही दिवस अर्जदार यांना गैरअर्जदारांनी व्यवस्थीत नांदविले व गैरअर्जदार क्र.२ ते ४ हे गैरअर्जदार क्र.१ यास अर्जदाराबाबत वारंवार फोन करून वाईट–साईट मनात भरून देत असत त्यामुळे गैरअर्जदार याने अर्जदारावर संशय घेवून दारू पिउन मारहाण करण्यास सुरूवात केली. गैरअर्जदार यांनी तिन्ही मुलांच्या वेळेस अर्जदाराची कोणतीही काळजी घेतली नसून दवाखान्यात न नेता अर्जदाराचे माहेरच्या लोकांना तुमची मुलगी तुम्हीच पहा असे सांगत असता अर्जदाराचे घरचे यांनी अर्जदार यांनी चांगली काळजी घेवून तिन्ही मुलांना चांगल्या प्रकारे सांभाळलेले आहे. गैरअर्जदार क्र.१ हा मुद्दाहून अर्जदारास त्रास देण्याकरिता वारंवार काही ना काही वस्तु घेवून येण्यास सांगत असे तसेच तिचेवर संशय घेवून वारंवार दारूच्या

नशेत मारहाण करत असे. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार यांना जून २०२४ मध्ये रात्रीच्या १२ ते १ च्या दरम्यान दारू पिवुन मारहाण केली व तुला जिवंत ठेवणार नाही, तुला पेटून देईल तसेच तु झोपेच असतांनाच तुला संपवून टाकेल असे म्हणत असे त्या कारणाने अर्जदार ही दुस–या दिवशी घाबरून माहेरी निघून आली व तेव्हापासून ती माहेरी राहत आहे. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार वारंवार फोनवर मारण्याची धमकी देत असे. अर्जदार क्र.१ ची एक मुलगी दहावीला व दुसरी मुलगी ही ७ वीला असून मुलींची शाळेची फार मोठ्या प्रमाणात नुकसान होत असे त्यामुळे अर्जदाराने दोन्ही मुली आसनगाव येथे बहिणीकडे थोड्या दिवसासाठी ठेवल्या असून त्या तेथून शाळेत जात आहे परंतू गैरअर्जदार क्र. १ हा मुलींना शाळेत जावून धमकावत आहे. अशा प्रकारे गैरअर्जदारांनी अर्जदार यांना शारिरिक व मानसिक त्रास दिलेला आहे व अर्जदाराचा एकतर्फा कोणतेही संयुक्तीक कारण नसतांना त्याग केलेला आहे त्यामुळे अर्जदारास नाईलाजास्तव अश्रितासारखे त्यांचे माहेरी राहावे लागत आहे. गैरअर्जदार क्र.१ हा मुंबई येथे बीएसटी मध्ये कायमस्वरूपी नोकरीला असून त्यास नोकरीपासून दरमहा ७०,०००/– ते ८०,०००/– पगार मिळत असून शेतीच्या उत्पन्नापासून ५ ते ७ लाख रूपये उत्पन्न मिळते. त्यामुळे अर्जदार यांची उपासमार होत आहे शिवाय गैरअर्जदार क्र.१ यांचेवर अर्जदारांव्यतिरिक्त इतर कोणीही अवलंबून नाही. गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदाराचा त्याग केल्यापासून विचारपूस केलेली नाही व मुलाच्या उदरनिर्वाहाची देखील विचारपूस केलेली नाही. अर्जदार यांना स्वत:च्या व मुलाच्या उदरनिर्वाहाकरिता महिन्यानाला रक्कम रू. ३५,०००/– खर्च येत असून औषधोपचारासाठी रक्कम रू.५,०००/– इतका खर्च येतो तो गैरअर्जदार यांचेकडून अर्जदार यांना मिळणे आवश्यक आहे तसेच अर्जदाराची राहण्याची व्यवस्था करू द्यावी अथवा घरभाडे म्हणून दरमहा रक्कम रू.५,०००/– अर्जदार हिस देण्याचा हुकुम होणे आवश्यक व गरजेचे आहे. अर्जदारास कोणताही कामधंदा नसल्याने व गैरअर्जदारांनी त्यांना हाकलून दिलेले असल्याने त्यांची उपासमार होत असून अर्जदार हिस तात्पुरती अंतरीम पोटगी म्हणून रक्कम रू.४५,०००/– मिळावी अशा आदेशाची प्रार्थना करते.

२. सदर प्रकरणामध्ये **नि.क्र.२४** वर गैरअर्जदार क्र. १ यांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर करून सदरहू अर्जास विरोध दर्शविला. त्यांनी असे कथन केले की, अर्जदार व

गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह दिनांक ०६/०५/२००६ रोजी झालेला असून सदर लग्नसंबंधातून त्यांना मुली पायल व संस्कृती व मुलगा स्वराज अशी अपत्ये झालेली आहे. लग्नानंतर अर्जदार गैरअर्जदार यांचे गावी वारंघुगी, ता.अकोले येथे सुमारे तीन वर्षे कसेबसे नांदली. त्यावेळी गैरअर्जदारास कोणतीही नोकरी नसून लग्नानंतर गैरअर्जदारास सुमारे ३ वर्षानंतर हंगामी स्वरूपाची नोकरी बी.एस.टी. मध्ये लागली. तेव्हा गैरअर्जदार हा गावी जावून येवून नोकरीच्या ठिकाणी राहुन नोकरी करू लागले त्यावेळी अर्जदार त्यास म्हणत असे की, मला तुझे आदिवासी गावात राहायचे नाही, नोकरी ठिकाणी राहायचे असून जमत असेल तर बघ नाहीतर मला फारकत दे अशी धमकी देवू लागली. त्यावेळी गैरअर्जदाराने तिची समजूत काढली असता अर्जदार ऐकण्याच्या स्थितीत नव्हती त्यामुळे सतत होणा–या त्रासामुळे गैरअर्जदार यांनी अर्जदार हीस नांदण्यास नोकरीच्या ठिकाणी नेले. लग्नानंतरही तीन मुले झालेनंतर अर्जदार हिचे स्वभावामध्ये कोणताही बदल झाला नाही उलट नेहमी मुलांचा रागराग करून मुलांची काळजी घेत नव्हती. अर्जदार सतत भांडणतंटा करत असे, कोणताही कामधंदा करत नव्हती या कारणाने गैरअर्जदाराने तिस समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता उलट उत्तरे देवून फारकत देवून टाका अशी धमकी देत असे तसेच वेळोवेळी अर्जदार ही तिची बहिण नामे मिनाबाई जाखेरे, आसनगाव येथे तिचे घरी नेहमी जात असे. तसेच तिच्या सल्ल्याप्रमाणे वागत असे. फेब्रुवारी २०१३ मध्ये तुम्ही भाड्याच्या खोलीमध्ये राहता, तुमची ऐपत मोठ घर घेवून राहण्याची नाही त्यामुळे मालकीचे घर पाहिजेच तरच नांदेल अशी धमकी अर्जदार क्र. १ हिने त्याला दिली त्यामुळे त्याने कर्ज काढून ६ लाख ५० हजार रूपयांना रूम अर्जदाराच्या नावावर विकत घेतली परंतू त्यानंतर देखील तिच्या स्वभावात बदल झाला नाही. त्यानंतर तिने दागिन्यांसाठी त्रास देण्यास सुरूवात केली असता माहे डिसेंबर २०१५ मध्ये त्याने कसेबसे तिला दागिने घेवून दिले. त्यानंतर सन २०१८ मध्ये अर्जदार क्र. १ हिला हाउस किपींगची नोकरी मिळाल्यानंतर तिच्या स्वभावात बदल झाला व तुमच्या पगारात माझे भागत आहे असे म्हणत तिने फारकतीचा तगादा लावण्यास सुरूवात केली व अर्जदार क्र. १ हि मुलांना घेवून तिच्या बहिणीकडे निघून गेली व नांदायला येण्यास स्पष्ट नकार दिला. तो पुढे असे कथन करतो की, त्याने अर्जदार क्र. १ ची समजूत घालून तिला परत नांदण्यास आणण्याचा बराच प्रयत्न केला परंतू त्याचा उपयोग झाला नाही. त्यानंतर दिनांक १६/०९/२०२४ रोजी जेव्हा

गैरअर्जदार क्र. १ याला अर्जदार क्र. १ ही कुर्ला स्टेशन येथे दिसली असता त्याने तिला विचारणा केली की तु कोणासोबत बोलत आहेत यावर तिने त्याला शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे कुर्ला पोलीस स्टेशन येथे अदखलपात्र तक्रार क्र. ११०४/ २०२४ दिली. पोलीसांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करून देखील त्याला यश आले नाही. तो पुढे असे कथन करतो की, कुठलेही कारण नसतांना अर्जदार क्र. १ हिने गैरअर्जदार क्र. १ चा त्याग केलेला असून ती हाउस किपींगच्या माध्यमातून दरमहा १५,०००/– रूपये कमावते या उलट गैरअर्जदार क्र. १ हा बीएसटी मध्ये वाहन चालक असून त्याच्यावर मोठ्या प्रमाणावर कर्ज झालेले असून सर्व हप्ते वजा जाता त्याला ५,०००/– दरमहा मिळतात. शिवाय वडिलोपार्जित जमिन ही डोंगराळ व खडकाळ असून त्यातून कुठलेही उत्पन्न नाही तसेच त्याच्या वयोवृद्ध आईवडिलांची जबाबदारी त्याच्यावर आहे. या सर्व कारणांमुळे तो सदरहू अर्ज रद्द करण्याची प्रार्थना करतो.

**३.** दोन्ही पक्षांच्या कथनांचा विचार करता माझ्यासमोर पुढील मुद्दे उपस्थित राहतात.

| अ.क्र | **मुद्दे** | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार सिध्द करते काय की, ती गैरअर्जदारांच्या हातून कौटूंबिक हिंसाचाराची बळी ठरली आहे ? | होय |
| २ | अर्जदार सिध्द करते काय, की, ती अर्जात मागितलेल्या सर्व मागण्या मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशत: होय |
| ३ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ करीता:**

**४.** अर्जाचे व अभिलेखाचे अवलोकन केले व अर्जदाराचा तिच्या विधिज्ञांमार्फत यूक्तीवाद ऐकला. अर्जदाराच्या अर्जाचे व नि.क्र.३/३ वरील समजूत पत्र, नि.क्र.३/४ व नि.क्र. ३/५ वरील पोलीस तक्रारींचे अवलोकन केले असता प्रथमसकृतदर्शनी असे दिसून येते की, अर्जदार हीला गैरअर्जदा क्र.१ याने त्यागल्या नंतर ती तिच्या मुलांसह हलाखीचे जीवन जगत

आहे. ज्याकरीता गैरअर्जदार यांच्या माध्यमातून होणारा कौटूंबिक छळ कारणीभूत आहे व अर्जदार ही गैरअर्जदारांच्या हातून कौटूंबिक हिंसाचाराची बळी ठरली आहे त्यामुळे मी **मूद्दा क्र.१ चे उत्तर होय** असे नोंदविले. संपूर्ण अभिलेखाचे, गैरअर्जदार क्र.१ याच्या **नि.क्र.२६** वरील मालमत्ता व दायित्व यांच्या शपथपत्राचे तसेच नि.क्र.२३/३ वरील वेतन पत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, गैरअर्जदार क्र.१ हा नोकरीच्या माध्यमातून महिण्याकाठी पूरेसे उत्पन्न मिळवतो त्यामुळे अर्जदारांचे पालनपोषण करण्याची जबाबदारी ही गैरअर्जदार क्र.१ ची असल्याने व गैरअर्जदार क्र.१ ज्या जीवनशैलीत जगतो त्या जीवनशैलीत जगण्याचा अधिकार हा अर्जदारांचा देखील असल्याने ती गैरअर्जदार क्र.१ याच्या जीवन स्तराचा विचार करता काही रक्कम अंतरिम पोटगी म्हणून मिळण्यास पात्र आहे. परंतू या स्तरावर सबळ पुराव्याअभावी अर्जदाराने मागणी केलेली संपूर्ण अंतरिम खावटीची पुर्ण रक्कम मंजूर करणे अशा परिस्थितीत योग्य होणार नाही. त्यामुळे अर्जदार हि गैरअर्जदारापासून निश्चित काही रक्कम अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे. सबब, दोन्ही पक्षांच्या जीवनस्तराचा विचार करता काही रक्कम अंतरिम पोटगी म्हणून मंजूर करणे योग्य होईल. वरील सर्व कारणांमुळे मी **मूद्दा क्र.२ चे उत्तर अंशत: होय** म्हणून नोंदवून **मूद्दा क्र.३** च्या उत्तरादाखल पूढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदारांना असे निर्देशित करण्यात येते की, त्यांनी अर्जदाराचा प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत कौटूंबिक छळ करू नये.

३. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदारांना अंतरिम पोटगी म्हणून एकत्रित रक्कम रू.१२,०००/- दरमहा अर्ज दाखल करण्याच्या तारखेपासून प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत द्यावी.

४. सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षकारांना विनामूल्य देण्यात यावी.

RAJKIRAN UTTAMRAO INGLE
Digitally signed by RAJKIRAN UTTAMRAO INGLE
Date: 2026.01.27 17:08:19 +0530

(आर. यु. इंगळे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (न्यायालय क्र.२),
इगतपुरी

**दिनांकः** २७/०१/२०२६

**आदेशाची प्रत विनामूल्य प्राप्त झाली.**

-------------------
अर्जदार

-------------------
गैरअर्जदार

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी शपथेवर निवेदन करते की, सदर पी.डी.एफ.संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव :- एस.आर.भापकर
न्यायालयाचे नाव :- न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (न्यायालय क्र.२),
पी.डी.एफ.दिनांक :- २७/०१/२०२६

स्वा/-
लघुलेखक